# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
## MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK
दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004


जाहिरात क्र. ०२/२०२४

## थेट मुलाखत (Walk in Interview)

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे विभागीय कार्यालय नागपूर, करीता विद्यापीठ निधीतून तात्पूरत्या स्वरुपात खालील नमूद पदांसाठी

अ) "विशेष कार्य अधिकारी" विवक्षित सेवा/कामांसाठी केंद्रशासन/ राज्यशासन शासकीय / निमशासकीय / स्वायत्त संस्थेच्या सेवेतून सेवानिवृत्त अधिकारी

ब) "वरिष्ठ सहायक" या पदावर माजी सैनिकांची करार पध्दतीने निश्चित वेतनावर निव्वळ तात्पूरती नियुक्ती करण्यासाठी Account Clerk, Logistic & Administrative या क्षेत्रातील कामकाजाचा अनुभव असलेल्या अर्हताधारक उमेद्वार

## अ) "विशेष कार्य अधिकारी"

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक येथे विवक्षित सेवा / कामांसाठी केंद्रशासन / राज्यशासन शासकीय / निमशासकीय / स्वायत्त संस्थेच्या सेवेतून सेवानिवृत्त अधिकारी यांच्या सेवा करार पध्दतीने नियुक्ती करणेकरीता थेट मुलाखत आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सदर पदांकरीता अर्हताधारक उमेदवारांनीच मुलाखतीकरीता स्वखर्चाने विद्यापीठाचे विभागीय कार्यालय, नागपुर येथे उपस्थित रहावे. त्याबाबतचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे :-

पदनाम : विशेष कार्य अधिकारी

एकूण पदे : ०१

आवश्यक अर्हता : राज्य/केंद्रशासन किंवा स्वायत्त संस्था किंवा अनुदानित संस्था यामधून गट - अ (ग्रेड पे रु. ७६००/- पेक्षा कमी) किंवा गट - ब (राजपत्रित व अराजपत्रित) सेवानिवृत्त अधिकारी

अनुभव : संबंधित विभागातील कामकाजाचा किमान तीन वर्षांचा अनुभव

वयोमर्यादा : वय ६२ वर्षापेक्षा जास्त नसावे

| अ. क्र. | विभाग | पदसंख्या | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १ | विभागीय कार्यालय, नागपूर | ०१ | विभागीय कार्यालयातील प्रशासकीय कामकाज, विभागीय कार्यालयाकरीता जागेचे प्रस्ताव तयार करणे, शासनाकडून मंजूरी घेणे, बांधकाम विषयक सर्व कामकाज बघून बांधकाम पूर्णत्वास नेणे, संबंधित विभागीय केंद्राकरिता नियुक्त प्रशासकीय अधिकारी यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे आवश्यक कामकाज |

अटी व शर्ती:

१. मासिक पारिश्रमिक व भत्ते : सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची विहित कार्यपध्दतीचे पालन करुन करार पध्दतीने नेमणूक करतांना त्यांना अशा नियुक्तीच्या वेळी मिळत असलेले मूळ निवृत्तीवेतन (अंशराशीकरण मुल्य विचारात न घेता) व त्यावरील महागाई भत्त्यासह मिळणाऱ्या रकमेएवढी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल. तसेच, ज्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा निवृत्तीवेतनार्ह नाहीत त्यांना सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेल्या वेतनाच्या आधारे मानीव निवृत्तीवेतनाचा रक्कम आणि त्यावर प्रचलित दराने महागाई भत्त्याची रक्कम हिशेबासाठी परिगणित करुन त्या आधारे मासिक पारिश्रमिक निश्चित करण्यात येईल.

२. निश्चित होणाऱ्या मासिक पारिश्रमिकाच्या जास्तीत जास्त २५ टक्के इतक्या मर्यादेपर्यंत एकमुस्त रक्कम "निवास भत्ता, प्रवासभत्ता आणि दूरध्वनीभत्ता" या सर्व भत्त्यांपोटी अनुज्ञेय असेल. तथापि, सदर रक्कम नियुक्त करावयाच्या अधिकारी/कर्मचारी यांची कार्यक्षमता, कार्यकुशलता, त्यांना पुरविण्यात आलेल्या सोयीसुविधा इ. बाबी विचारात घेवून निश्चित करण्यात येईल.

३. नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील. याबाबत नियुक्ती देण्यात येणाऱ्या अधिकाऱ्याने बंधपत्र/हमीपत्र देणे बंधनकारक असेल. तसेच, सदर बंधपत्रात जाहिरातीत नमूद व विद्यापीठाने निश्चित केलेल्या अतिरीक्त अटी व शर्ती मान्य असल्याबाबत तसेच करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीकडून नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही असा उल्लेख करणे आवश्यक राहील.

४. सदर बंधपत्र/हमीपत्र प्राप्त झाल्यानंतरच संबंधित सेवानिवृत्त अधिकाऱ्यास तात्पूरती नियुक्ती आदेश देण्यात येईल.

५. सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त एका वर्षासाठी देण्यात येईल. नियुक्तीचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर त्यांचे कामकाजाचा आढावा घेवून कामाचे मूल्यमापन केले जाईल. नियुक्तीची आवश्यकता व संबंधितांची सेवा समाधानकारक असल्यास वाढीव कालावधीकरीता दरवर्षी नियुक्तीचे नुतणीकरण करण्यात येईल. मात्र, नियुक्तीचा एकूण कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

६. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीस वय वर्ष ६५ नंतर नियुक्ती देण्यात येणार नाही.

७. करार पध्दतीने नियुक्त करावयाची व्यक्ती शारिरीक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावी. तसेच, प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

८. करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

९. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीस आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीवेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवासभत्ता व दैनिकभत्ता अनुज्ञेय राहील.

१०. करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या / विद्यापीठाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे / सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार / हक्क नसेल.

११. नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा उमेद्वाराच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

१२. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यवसायिक कामात गुंतलेली नसावी.

१३. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (Conflict of interest) जाहिर करणे आवश्यक राहील.

१४. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे / माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

१५. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील.

१६. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान केले जाणार नाही.

१७. उमेद्वाराने दि. ०७/०३/२०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता विहीत अर्ज व खालील मूळ कागदपत्र, साक्षांकीत केलेल्या छायांकीत प्रतींसह डिपार्टमेंट ऑफ ट्रायबल हेल्थ, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे नागपूर विभागीय केंद्र, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आवार, शासकीय डेंटल कॉलेज च्या बाजूला, मेडिकल स्क्वेअर, हनुमान नगर, नागपूर ९ येथे मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावेः

अ) जन्मतारखेचा पुरावा

ब) शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र

क) शासकीय/निमशासकीय/स्वायत्त संस्थेच्या सेवेतून सेवानिवृत्तीचे दस्तऐवज/डीस्चार्ज बुक

ड) निवृत्ती वेतनासंबंधी दस्तऐवज

इ) संगणक साक्षरता प्रमाणपत्र (असल्यास)

ई) अनुभव प्रमाणपत्र

१८. उमेद्वारास मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१९. विहित दिनांक व वेळेत उपस्थित न झालेल्या उमेद्वारांचा विचार करण्यात येणार नाही. तसेच टपालाव्दारे प्राप्त झालेल्या अर्जांबाबत विद्यापीठामार्फत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

२०. जाहिरातीत नमूद केलेले पद भरणे किंवा न भरणे याचा हक्क विद्यापीठाने राखून ठेवलेला आहे.

२१. सदर भरती प्रक्रियेअंतर्गत निर्माण होणाऱ्या बाबींवर मा. कुलगुरु यांनी घेतलेले निर्णय अंतिम असतील.

# ब) "वरिष्ठ सहायक"

"वरिष्ठ सहायक" या पदावर माजी सैनिकांची करार पध्दतीने निश्चित वेतनावर २९ दिवसांच्या नियुक्तीने खालील पदावर सैनिकी सेवेतून सेवानिवृत्त माजी सैनिकांची करार पध्दतीने नियुक्ती करणेकरीता थेट मुलाखत आयोजित करण्यात आलेली आहे. तरी, सदर पदाकरीता Account Clerk, Logistic & Administrative या क्षेत्रातील कामकाजाचा अनुभव असलेल्या उमेद्वारांनीच मुलाखतीकरीता स्वखर्चाने विद्यापीठाचे विभागीय कार्यालय नागपूर येथे उपस्थित रहावे.

| अ.क्र. | पदनाम | प्रतिमाह निश्चित वेतन | एकूण पदे |
|---|---|---|---|
| ०१ | वरीष्ठ सहायक | २३,८००/- | ०१ |

सर्वसामान्य अटी व सूचना :

१. उमेद्वार माजी सैनिक असावा.

२. नियुक्त कर्मचाऱ्यास निश्चित वेतनाव्यतिरीक्त इतर कोणतेही आर्थिक लाभ अनुज्ञेय असणार नाही.

३. सदर पदावरील नियुक्ती विद्यापीठ निधीतून तात्पूरत्या स्वरुपात असल्यामुळे नियुक्ती देण्यात आलेल्या उमेद्वाराचे विद्यापीठ नियमित सेवेत समावेशन होणार नाही व याअनुषंगिक नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ लागू असणार नाही, त्यावर हक्क सांगता येणार नाही.

४. निवड झालेल्या उमेद्वारास २९ दिवसांच्या कालावधीचे नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील. प्रत्येक नियुक्तीनंतर एक दिवसाचा तांत्रिक खंड देण्यात येईल. सदर नियुक्ती तात्पुरत्या स्वरूपात असल्यामुळे संबंधितास सदर पदावर कायम होण्याचा हक्क प्राप्त होणार नाही.

५. उमेद्वार महाराष्ट्र राज्यातील रहीवासी असावा.

६. मराठी व इंग्रजी भाषा लिहीता व वाचता येणे बंधनकारक आहे.

७. शैक्षणिक पात्रता किमान पदवी किंवा समकक्ष असावी.

८. उमेद्वार शारिरीक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा व चारित्र चांगले असावे.

९. अर्जदाराचे वय ५५ वर्षे पेक्षा जास्त नसावे.

१०. सदर मुलाखतीकरीता Account Clerk, Logistic & Administrative या क्षेत्रातील कामकाजाचा अनुभव असलेल्या उमेद्वारांनीच उपस्थित रहावे.

११. स्थानिक उमेद्वारास प्राधान्य देण्यात येईल.

१२. मराठी/इंग्रजी टंकलेखन कौशल्य असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

१३. शिस्त व अपील विषयक बाबींकरीता विद्यापीठातील इतर कर्मचाऱ्यांना लागू असलेले नियम किंवा वेळोवेळी विहीत केले जाणारे / प्राधिकरणाने ठरविलेले नियम लागू राहतील.

१४. इच्छुक उमेद्वाराने दि.०७/०३/२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता विहीत अर्ज व खालील मूळ कागदपत्र व त्यांच्या साक्षांकीत केलेल्या प्रतीसह

डिपार्टमेंट ऑफ ट्रायबल हेल्थ, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे नागपूर विभागीय केंद्र, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आवार, शासकीय डेंटल कॉलेज च्या बाजूला, मेडिकल स्क्वेअर, हनुमान नगर, नागपूर ९ येथे मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावेः

अ) स्वपरिचयपत्र

ब) जन्मतारखेचा पुरावा

क) डिस्चार्ज बुक

ड) संगणक साक्षरता व टंकलेखन प्रमाणपत्र (असल्यास)

१५. मुलाखतीच्या दिनांकास आवश्यक अर्हता व वय ग्राहय धरण्यात येईल.

१६. वरील नमूद अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या उमेद्वारांनीच (माजी सैनिक) मुलाखतीस हजर रहावे.

१७. नियूक्त उमेद्वाराने शारिरीक पात्रतेचे वैद्यकीय प्रमाणपत्र (Medical Fitness Certificate) रुजू झाल्यानंतर १५ दिवसांच्या आत विद्यापीठास सादर करणे अनिवार्य राहील.

१८. उमेद्वारास मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१९. विहित दिनांक व वेळेत उपस्थित न झालेल्या उमेद्वारांचा विचार करण्यात येणार नाही. तसेच टपालाव्दारे प्राप्त झालेल्या अर्जाबाबत विद्यापीठामार्फत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

२०. जाहिरातीत नमूद केलेल्या पदांच्या संख्येत बदल करणे, पदे भरणे किंवा न भरणे / प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार विद्यापीठाने राखून ठेवले आहेत.

२१. सदर भरती प्रक्रियेअंतर्गत निर्माण होणाऱ्या बाबींवर मा. कुलगुरु यांनी घेतलेले निर्णय अंतिम असतील.

२२. या जाहिराती संदर्भात कोणतेही न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास त्याबाबत न्यायालयीन कार्यकक्षा नाशिक असेल.

सही/-
कुलसचिव
मआविवि, नाशिक

दि. : १६/०२/२०२४
ठिकाण : नाशिक

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

जाहिरात क्र.०२/२०२४
थेट मुलाखत

प्रति,
मा. कुलसचिव
महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ
दिंडोरी रोड, म्हसरुळ,
नाशिक - ४२२ ००४

Paste recent Passport Size photo duly self attested

विषय : ______________________ पदासाठी अर्ज ...

महोदय,

मी उपरोक्त पदासाठी खालील तपशिलासह अर्ज सादर करीत आहे.

१) नाव : ____________________________________________

आडनाव नाव वडिलांचे / पतीचे नाव

२) पत्रव्यवहाराचा पत्ता : ____________________________________________

____________________________________________

____________________________ पिन कोड ____________________

३) कायमचा पत्ता : ____________________________________________

____________________________________________

____________________________ पिन कोड ____________________

४) फोन नं : एसटीडी कोड ______________ (घरचा नं.) ____________________

ई-मेल ______________________ भ्रमणध्वनी क्र. ____________________

५) जन्मतारीख : ______________________

(अक्षरी) ____________________________________________

६) राष्ट्रीयत्व : ____________________ ७) जात : ____________________

८) लिंग : स्त्री / पुरुष

९) विवाहित / अविवाहित (विवाहित असल्यास परिशिष्ठ 'अ' जोडावे)

१०) संगणकीय ज्ञान : **(MS-CIT, etc.)** : होय / नाही

११) शैक्षणिक/व्यवसायिक/तांत्रिक शिक्षण :

| अ.क्र. | परीक्षा उत्तीर्ण | मंडळ / विद्यापीठ | उत्तीर्ण वर्ष | विषय | टक्केवारी | ग्रेड |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

१२) अनुभव :

| संस्थेचे नाव | पद | अनुभवाचा कालावधी | | |
|---|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत | एकूण |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

घोषणापत्र :

मी, जाहिर करतो की, या अर्जामध्ये सादर केलेली माहिती व त्यासोबतची कागदपत्रे सत्य, पूर्ण व बरोबर आहेत. उपरोक्त माहितीपैकी कोणतीही माहिती चूक किंवा अपूर्ण आढळून आल्यास माझी नियुक्ती रद्द होऊ शकते याची मला जाणीव आहे. तसेच मला कोणतीही पूर्व सूचना न देता माझा अर्ज रद्द केला जाऊ शकतो. जाहिरातीमध्ये दिलेली संपूर्ण माहिती मी काळजीपूर्वक वाचली आहे.

दिनांक :

ठिकाण : (उमेद्वाराचे नाव व स्वाक्षरी)

परिशिष्ट 'अ'

महाराष्ट्र नागरी सेवा नियम (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र)
नियम २००५ मधील प्रतिज्ञापत्राचा नमुना "अ"
प्रतिज्ञापत्र
(विवाहीत उमेदवारासाठी)
नुमना "अ"
(नियम ०४ पहा)

मी श्री. / श्रीमती / सौ..............................................................................

श्री. ...........................................................यांचा / यांची मुलगा/ मुलगी/

पती / पत्नी, वय ...........वर्षे, राहणार ......................................................

........... ...................................... याद्वारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो / करते

की,

१) मी .................................. या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला ................. (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी २८ मार्च २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ....................... आहे. (असल्यास जन्मदिनांक नमुद करावा).

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दि. २८ मार्च २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या अपत्यांमुळे या पदासाठी मी अपात्र ठरेल, याची मला जाणीव आहे.

ठिकाण :

दिनांक : अर्जदाराची सही